पुढारी

# राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत कोरोनाबाबत जनजागृती

**चंदगड : पुढारी वृत्तसेवा**

जगात कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. एक सामाजिक जाणीव म्हणून नागरिकांनी कोरोनाबाबत खबरदारी घेतली पाहिजे. गरजूंना मदत झाली पाहिजे ही भावना मनात ठेवून आणि नागरिकांच्यामध्ये जनजागृती करावी यासाठी राष्ट्रीय सेवा योजना यशवंतराव चव्हाण महाविद्यालय व गुरुवर्य गुरुनाथ विठ्ठल पाटील कनिष्ठ महाविद्यालय हलकर्णी यांच्यामार्फत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या मदतीने जनजागृती व मदत केली जात आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी. वाय. निंबाळकर व राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रकल्प अधिकारी डॉ. राजेश घोरपडे, डॉ. चंद्रकांत पोतदार, प्रा. सी. एम. तेली, प्रा. पी. एम. दरेकर यांनी सोशल मीडियामार्फत कोरोना जनजागृती उपक्रम सुरू केला.

शिवाजी विद्यापीठाने दिलेल्या सूचनेनुसार 'युनिशिवाजी एनएसएस फाईट कोविड' हा विद्यार्थ्यांचा ग्रुप तयार करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक कोरोना बाबतचे ट्रेनिंग घेत आहेत. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी काय करावे, यासाठी ग्रुपद्वारे मार्गदर्शन केले जात आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः ट्रेनिंग घेऊन ते आपल्या कुटुंबीयांना समजावून सांगत आहेत. चित्रांद्वारे, रांगोळीद्वारे, तसेच पोस्टरद्वारे कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी काय काळजी घ्यावी, याबाबतचे संदेश व्हॉटस् अॅपद्वारे फेसबुकद्वारे समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. काही विद्यार्थी गावामध्ये ग्रामपंचायत, पोलिसांना मदत करत आहेत. गरजू लोकांना स्वयंसेवक धान्याच्या स्वरूपात मदत करीत आहेत. ज्या गावामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आहे त्या प्रत्येक गावांमध्ये जनजागृतीचे काम स्वयंसेवक करत आहेत. विद्यापीठाकडून महाविद्यालयाकडून त्यांना मार्गदर्शन केले जात आहे. त्यामुळे घराघरात कोरोना रोखण्या बाबतचे संदेश पोहोचत आहेत. घरी बसून आणि सोशल मीडियाद्वारे विद्यार्थी जनजागृतीचे काम करीत आहेत.

लोकमत

याच्याकडे केला.

## कोरोना : सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती

# 'एनएसएस'चे २८ हजार स्वयंसेवक सेवेसाठी तत्पर

लोकमत न्यूज नेटवर्क

**सहभाग नोंदवा :** सातारा, सांगली आणि कोल्हापूरमधील प्रशासनाच्या मदतीसाठी हेल्पलाईनमध्ये काम करण्यासाठी इच्छुक स्वयंसेवकांची पालकांच्या परवानगीने नोंदणी सुरु आहे. त्यासाठी स्वतंत्र गुगल रजिस्ट्रेशन फॉर्म तयार केला आहे. त्याद्वारे स्वयंसेवकांनी नोंदणी करावी. या राष्ट्रीय आपत्तीच्या क्षणी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन डॉ. शिंदे यांनी केले.

**कोल्हापूर :** कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या साथीला रोखण्यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेतील (एनएसएस) सुमारे २८ हजार स्वयंसेवक नागरिकांच्या सेवेसाठी आणि प्रशासनाच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदतीसाठी तत्पर आहेत. ही कामे करीत असताना त्यांनी नागरिकांबरोबरच स्वत:च्या आरोग्याचीही दक्षता घ्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी केले.

'एनएसएस'चे स्वयंसेवक सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृतीचे कार्य प्रभावीपणे करीत आहेत. त्याद्वारे ५० लाखांहून अधिक लोकांपर्यंत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पद्धतीने पोहोचत आहेत. अगदी नागरिकांच्या कौटुंबिक अडीअडचणींची माहिती घेऊन अनेकवेळा स्वत:, तर काहीवेळा प्रशासनाच्या माध्यमातून त्यांना तत्परतेने मदत करीत आहेत. गरजू, फिरस्ते, गावोगावचे असहाय ज्येष्ठ नागरिक, अनाथ, दिव्यांग, आदी लोकांच्या मदतीला जात आहेत. लोकांना सॅनिटायझर्स, मास्क यांचे वितरण, किराणा, भाजीपाला, औषधे व इतर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा, आदी महत्त्वाची कामे स्वयंसेवक करीत आहेत.

लोकमत

# विद्यापीठात 'ऑनलाईन कार्यशाळा' उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सायबर सिक्युरिटीविषयक ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळेत ई-मेल, पासवर्ड, आदी सुरक्षेबाबत तज्ज्ञांनी शुक्रवारी मार्गदर्शन केले. दिल्ली, महाराष्ट्र, तमिळनाडू, कर्नाटक, गोवा, आदी राज्यांतून ६१ जण यात सहभागी झाले.

सकाळी १० वाजता कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. सायंकाळी पाच वाजेपर्यंत विविध सत्रांमध्ये इंट्रोडक्शन टू सायबर सिक्युरिटी, सायबर अ‍ॅटॅक्स क्लासिफिकेशन आणि स्मार्टफोन अँड पेमेंट सिक्युरिटी, वेबसुरक्षा, डिजिटल व्यवहारांबाबत 'नॅसकॉम'चे बदामी, प्रज्ञा पोफळीकर, अमोल बागल, आदींनी मार्गदर्शन केले. 'गो वेबिनार' प्रणालीचा उपयोग कार्यशाळेसाठी केला, अशी माहिती विद्यापीठातील सायबर सिक्युरिटी व डाटा सायन्सेस फॅकल्टी डेव्हलपमेंट केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी दिली.